तंजावरच्या भोसले घराण्यातील सरफोजी राजे भोसले द्वितीय यांचे जीवन व कार्य

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानस, विधी व सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर करावयाच्या

संशोधन प्रबंधाचा आराखडा

संशोधक

प्रा. कानडे बालासाहेब गोंविदराव

श्री गुरु बुध्दिस्वामी महाविद्यालय,पुर्णा (जं.)

ता.पूर्णा जि.परभणी

मार्गदर्शक

प्रा.डॉ. बंडे शारदा गोंविदराव

इतिहास विभाग प्रमुख

स्वा.सैनिक सुर्यभानजी पवार महाविद्यालय,पुर्णा

ता.पुर्णा जि.परभणी

संशोधन केंद्र

पानसरे महाविद्यालय,अर्जापूर

ता.बिलोली जि.नांदेड

(नोव्हेंबर २०१९)

तंजावरच्या भोसले घराण्यातील सरफोजी राजे भोसले द्वितीय यांचे जीवन व कार्य

इतिहास विषयाच्या पीएच.डी शोध प्रबंधाची रुपरेषा :

प्रस्ताविक :

हिंदुस्थानच्या इतिहासात अतुल्य कामगिरीसाठी प्रसिध्द असलेल्या भोसले घराण्याने आपल्या कतृत्वाने भारताच्या इतिहासाला कलाटणी दिलेली आहे यात शंका नाही. या घराण्याच्या प्रामुख्याने कोल्हापुरचे भोसले घराणे, साताराचे भोसले घराणे, नागपुरचे भोसले घराणे, तंजावरचे भोसले घराणे अशा विविध शाखा देशाच्या विविध भागात राज्य करत होत्या. या घराण्याने पारतंत्र्या विरुध्द लढण्याची प्रेरणा भारत व भारता बाहेरील देशातील जनतेला दिली. त्यांनी भारताच्या विविध भागात मराठी संस्कृती रुजवण्याचे मोठे कार्य केले.

या विविध शाखात तंजावरचे भोसले घराणे महत्वपुर्ण आहे. परंतू आजही या घराण्याचा इतिहास दूर्लक्षित आहे. हिंदुस्थानच्या सुदुर दक्षिणेत (कर्नाटक, तामिळनाडू च्या भागात) या घराण्याने राज्य केले. हा भुभाग जरी तमिळ, तेलगू, कन्नड इत्यादी भाषिक असला तरी राज्यकर्ते मात्र मराठी भाषिक होते. त्यांनी जनतेची सेवा केली. त्यामुळे त्यांच्या राज्यात शांतता नांदली, कसलाही कलह निर्माण झाला नाही. उलट वेगवेगळ्या भाषेत साहित्य निर्माण झाले तसेच कला व संस्कृती बहरली, सांस्कृतिक प्रगतीही घडून आली. साहित्य, कला, नाट्य, आयुर्वेद, पाकशास्त्र इत्यादी क्षेत्रात या घराण्याचे महत्वाचे योगदान राहिले आहे. या घराण्यात सरफोजी राजे द्वितीय (1798-1832) हे महान राजे होऊन गेले. त्यांनी जवळजवळ 35 वर्षे राज्य कारभार पाहिला. त्यांना इंग्रजाच्या कृपेने राज्य करावे लागले तरी त्यांच्या काळात साहित्य, संगीत, नृत्य, वैद्यक, चित्रकला इत्यादी क्षेत्रात देदिप्यमान कामगिरी घडून आली. ते कलेचे भोक्ते होते. त्यांची कारकिर्द सांस्कृतिकदृष्टया महत्वपुर्ण ठरली. ते दृष्टे राजे होते. त्यांच्या काळात ‘सरस्वती महाल’ ही पब्लिक लायब्ररी स्थापन झाली. या ग्रंथालयात हजारो दुर्मिळ पुस्तके व हस्तलिखिते आढळून येतात. ही

ग्रंथसंपदा विविध भाषेत आढळून येते. महाराज स्वतः कवी होते. त्यांनी भरतनाट्यम, संगीत कलेस प्रोत्साहन दिले. महाराजास वैद्यकशास्त्राची आवड होती. सुमारे 200 वर्षापूर्वी त्यांनी मोतीबिंदूची शस्त्रक्रिया त्यांच्या राज्यात घडून आली. महाराजांना शिल्पकलेची आवड होती. त्यांनी विविध वास्तु उभारल्या. त्यांनी आपल्या राज्यात छापखाना सुरु केला. महाराजांची दृष्टी संशोधकाची होती. त्यांनी आपल्या राज्यात पवनचक्की, विद्युत यंत्र, वेधशाळा उभारले. त्यांच्या काळात तंजावर हे विद्येचे केंद्र बनले. महाराज स्वतः लेखक होते. त्यांनी वैद्यकशास्त्रावर ग्रंथ लिहिले. ते स्वतः उच्च विद्याविभुषित होते. त्यांना जवळजवळ 14 भाषा ज्ञात होत्या. त्यांनी ज्ञानाची कास धरली. ते स्त्री मुक्तीचे पुरस्कर्ते होते. त्यांनी ख्रिश्चन मिशनरी शाळांना व दर्ग्यांना मदत केली. महाराजांनी भाषा, साहित्य आणि विज्ञानाला महत्व दिले. तंजावर पासून जवळच त्यांनी मनोरा येथे सिपयार्ड बांधले. त्यांनी नौदल अभ्यास केंद्र सुध्दा उभारले. त्यांनी हवामान संशोधन केंद्र सुरु केले होते शिवाय बंदुकीचा कारखाना उभारला. तंजावरच्या बृहदिश्वर मंदिरात इ.स.1803 मध्ये भोसले घराण्याच्या वंशावळीची माहिती देणारा शिलालेख कोरविला. मंदिराच्या देखभालीसाठी त्यांनी देणग्या दिल्या. उपरोक्त वर्णनावरुन आपणास दिसून येते की, महाराजांची दृष्टी मर्मज्ञ होती. असा हा महान दुरदृष्टीचा राजा होता.

विषयाची निवड व महत्त्वः-

अनेक इतिहासकारांचे असे मत आहे की, भारताचा इतिहास उत्तर भारताला केंद्रस्थानी ठेवून लिहीण्यात आला. त्यांच्या मते, दक्षिण भारताचा इतिहास दुर्लक्षिला गेला. मध्ययुगीन काळात 'तंजावर' येथे भोसले घराण्याची स्थापना झाली. या घराण्याने दक्षिण भारताच्या इतिहासात महत्वाचे योगदान दिलेले आहे. सुदुर दक्षिणेत मराठयांचे राज्य निर्माण होणे ही महाराष्ट्रासाठी भुषणावह बाब आहे. या घराण्याविषयी माहिती देणारी प्रचंड कागदपत्रे उपलब्ध आहेत. मात्र त्यांचा अभ्यास अजुनही दुर्लक्षित आहे. याची विविध कारणे आहेत. मात्र तो देदिप्यमान इतिहास जगापुढे आणखी प्रखरपणे यावा असे वाटते. या गरजेतुनच या घराण्याच्या इतिहासाचा धुंडावळा घेणे क्रमप्राप्त ठरते.

संशोधनाचा हेतुः-

सुदूर दक्षितेत तंजावर येथे मराठ्यांनी राज्य केले. ही बाब महाराष्ट्रासाठी अभिमानाची आहे. मराठा छत्रपतींनी गनिमी काव्याने शत्रुला पाणी पाजले हा इतिहास आहे. परंतु असे काही राजे या घराण्याने दिले जे कलेचे भोक्ते, विद्याव्यासंगी होते. त्यांच्याकडे दुरदृष्टी होती. जनकल्याणाची तळमळ होती. त्यांनी जनतेला सुखी बनविले. तंजावरची जनता तमिळ, तेलगु, कन्नड इत्यादी बहुभाषिक असुनही राज्यकर्ते मात्र मराठी होते. परंतु त्यांनी जनतेच्या कल्याणाला महत्व दिले त्यामुळे या घराण्याचा इतिहास विशेषतः सफरोजी राजे भोसले द्वितीय यांचे प्रचंड भरीव कार्ये जगापुढे यावे हा हेतु या संशोधनाचा आहे.

संशोधनाची उद्दिष्टयेः-

तंजावरच्या भोसले घराण्या विषयी भारताच्या विविध विद्यापीठात मोठ्या प्रमाणावर संशोधन झाले आहे. प्रामुख्याने दक्षिण भारतातील विविध विद्यापीठात विविध भाषेतुन संशोधन हाती घेण्यात आलेले आहे. तंजावरच्या सरस्वती महालात हजारो दुर्मिळ ग्रंथ आजही शाबुत आहेत. असंख्य मोडी देवनागरी भाषेतील हस्तलिखिते आहेत. त्यावर तमिळ व तेलगु भाषेचा प्रभाव असल्याने या साहित्याचा विविध भाषेत अनुवाद करण्यासाठी तज्ञांची गरज असली तरी संशोधनाला प्रचंड वाव आहे. सुदूर दक्षिणेतील या मराठी राज्याचा इतिहास आजही दुर्लक्षित आहे असे मान्य करावे लागेल. या मराठी राज्यकर्त्यांनी मराठी संस्कृती दक्षिणेत रुजवताना भारताची सांस्कृतिक जडणघडण घडवून आणली. विविध क्षेत्रात भरीव योगदान दिले. आपली मूल्ये जपताना त्यांनी चोख राज्यकारभार केला.

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टये खालील प्रमाणे सांगता येतील.

1) तंजावरच्या भोसले घराण्याचा इतिहासातील योगदानाचा अभ्यास करणे.

2) सरफोजी राजांच्या व्यक्तीमत्वातील कंगो-यांचा धुंडावळा घेणे.

3) सरफोजी राजे (द्वितीय) यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे.

4) महाराजांच्या कार्य व कर्तृत्वाचा अभ्यास करणे.

5) महाराजांच्या विविध क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.

6) महाराजांच्या जीवनातुन भावी पिढीला प्रेरणा देणा-या बाबींचा अभ्यास करणे.

7) महाराजांच्या व्यक्तिमत्वातील उदात्त बाबींचा शोध घेणे.

संशोधनाची गृहितके :-

तंजावरच्या भोसले घराण्याविषयी देशातील विविध विद्यापीठाअंतर्गत संशोधन झाले आहे. प्रामुख्याने तंजावर विद्यापीठाने मोठ्या प्रमाणावर संशोधन केलेले आहे. तंजावरच्या सरस्वती महाल या ग्रंथालयात लक्षावधी दुर्मिळ ग्रंथ जतन करण्यात आलेली आहेत. प्रचंड मोठ्या प्रमाणात मोडी भाषेतील हस्तलिखिते, संस्कृत ग्रंथ, काव्य, नाटके, टिकात्मक ग्रंथ आहेत. या हस्तलिखीतावर तमिळ, तेलगु भाषेचा प्रभाव असल्यामुळे त्यांचे विश्लेषण करण्यासाठी तज्ञ व्यक्तिची गरज आहे. वाचनालयात व्याकरण, औषधशास्त्र, संगित, नाट्य, नृत्य, स्थापत्य, खगोलशास्त्र इत्यादी वरील हजारो ग्रंथ उपलब्ध आहेत. तरी प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक साधनांचे महत्व अनन्यसाधारण राहणार आहे. विषयास अनुसरुन विविध ग्रंथाचा आधार हा संशोधन विषयक ग्रंथ पुर्ण करण्यासाठी उपयोग होणार आहे. या शिवाय विविध साहित्यीकांनी या घराण्याच्या इतिहासावर प्रकाश टाकला आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

या घराण्या विषयी प्रचंड संशोधन झाले असले तरी प्रस्तुत संशोधनात या घराण्यातील सरफोजी राजे भोसले द्वितीय यांच्या कारकिर्दीतील घडामोडींचा अभ्यास या संशोधनाचा विषय आहे. यामुळे या मर्यादित कालखंडामधील इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हा कालखंड अभ्यासण्याच्या संदर्भात उपयोगी ठरणाच्या ग्रंथाचा अभ्यास केला जाणार आहे. या घराण्याविषयी लक्षावधी हस्तलिखिते उपलब्ध असले तरी या सर्वांची नोंद प्रस्तुत प्रबंधात घेणे शक्य नाही. त्यामुळे विशिष्ट बाबींशी निगडित अशा बाबींचाच अभ्यास करणे शक्य होणार आहे याची कल्पना संशोधन कर्त्यास आहे.

संशोधन पध्दती:-

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केलेला असुन त्या करीता प्राथमिक साधने आणि दुय्यम साधने यांचा वापर केलेला आहे. प्राथमिक साधनात पाश्चात्य प्रवाशांच्या डाय-या, त्यांचे अनुवादीत ग्रंथ, ऐतिहासीक पत्र व्यवहार, बृहदेश्वर मंदिरातील शिलालेख, तमिळ विद्यापीठाने प्रकाशित केलेले ग्रंथ (Fifty copper plates of the marathas of Tanjore, Inscriptions of Tanjore Maratha Kings) इत्यादी ग्रंथ

र दुय्यम साधानात पारसनीस द.ब., वाकसकर वि.स., सुब्रम्हण्यम के.आर., सेतु माधवराव पगडी, राजय्यन के. इत्यादी लेखकांच्या साधन ग्रंथाचा उपयोग होणार आहे.

साहित्याचे पुनरावलोकन :-

या घराण्याविषयी माहिती देणारे विविध शिलालेख, समकालिन ग्रंथ परकिय प्रवाशांच्या डाय-या इ. ग्रंथातुन माहिती उपलब्ध आहे. अलीकडच्या काळात विविध संशोधन झाले आहे याचा फायदा या संशोधनासाठी होणार आहे. महाराष्ट्रातही या घराण्याविषयी कुतुहल असले तरी या घराण्याचा इतिहास म्हणावा तसा महाराष्ट्रीयन जनतेपुढे आला नाही. असे असले तरी काही तज्ञ मंडळीनी या घराण्याविषयी माहिती मिळवून ती ग्रंथबध्द केली आहे. यात डॉ. विवेकांनद गोपाळ यांनी या घराण्याच्या काही कागदपत्रांचा खंड प्रकाशित केला आहे. काही मोडी कागदपत्रांचे विविध भाषेत अनुवाद झालेले आहेत. प्रो. राजु यांनी तंजावरचे शिलालेख व ताम्रपट प्रकाशित केले आहेत. प्रो.व्यंकटरामय्या यांचे लिखान सुध्दा महत्वपुर्ण आहे. पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. पुणे येथील डेक्कन कॉलेजमध्येही या घराण्याविषयीची माहिती उपलब्ध आहे. पुणे विद्यापीठातुन डॉ. विद्या गाडगे यांनी तंजावरचे राज्य आणि मराठी सत्ताः राजकीय व सांस्कृतिक संबंध या शिर्षकाखाली पी.एच.डी. प्रबंध सादर केलेला आहे.

संशोधन आराखड्याची रुपरेषाः-

प्रकरण पहिले- प्रस्तावना (तंजावर घराण्याचा पूर्व इतिहास)

तंजावर वर सुरुवातीस चोलांचे राज्य होते. पुढे पांडय, दिल्ली सुलतान, विजयनगर, मदुराई नायक, तंजावर नायक यांच्या अंमलाखाली हा प्रदेश होता. तंजावर नायक राजा विजय राघव यांचा खून झाल्यावर त्यांच्या मुलाने आपले राज्य परत मिळविण्यासाठी अदिलशाहीची मदत मागितली. यावेळी शहाजी राजे भोसले आपला पुत्र व्यंकोजी राजे भोसले याच्या सह अदिलशाहाची चाकरी करीत होते. अदिलशाहाने शहाजी पुत्र व्यंकोजीस सैन्य देऊन तंजावरच्या नायकापासून राज्य परत घेण्यासाठी पाठविले. परंतु व्यंकोजीने तंजावर ताब्यात घेऊन आपली स्वतंत्र सत्ता स्थापन केली.

प्रकरण दुसरे- तंजावरचे भोसले घराणे :

तंजावरच्या भोसले घराण्यातील प्रथम राजे म्हणजे व्यंकोजी राजे भोसले (इ.स.1974 ते 1684) होते. ते छत्रपती शिवरायांचे सावत्र भाऊ (शहाजी राजांच्या तुकाबाई या पत्नीपासून झालेले पुत्ररत्न) होते. शिवराया विरुध्द त्यांनी शत्रुत्वाची भुमिका घेतली. शिवराया विरुध्द पराभूत होऊन ते पळून गेले. त्यांचे राज्य बळकावण्याचा शिवरायांचा हेतु नव्हता. कारण त्यांनी उदार मनाने त्यांचे राज्य अबाधित ठेवले. त्यांच्या नंतर अनुक्रमे शहाजी, सफरोजी प्रथम, तुकोजी, प्रतापसिंह, तुळाजी यांनी राज्य केले. तुळाजीच्या काळात कर्नाटकच्या नवाबाने तंजावर वर आक्रमन करुन कब्जा केला. त्यावर तुकोजीने ईस्ट इंडिया कंपनीच्या साहाय्याने आपले राज्य परत मिळविले. पुढे गादीवर आलेल्या सरफोजी राजे द्वितीय यांनी ब्रिटीशांच्या मदतीने चुलत्यापासून संरक्षण मिळविले. ब्रिटीशांनी 1799 मध्ये तंजावर संस्थान खालसा करुन मद्रास प्रेसिडेंसीत सामिल केले. 1799 ते 1832 या कालावधीत सरफोजी राजे द्वितीय यांनी नामधारी राजा बनुन कार्य केले. त्यांच्या काळात सरस्वती महाल ही पब्लिक लायब्ररी स्थापन झाली. ही त्यांची महान कामगिरी ठरते. या राजाची कारकिर्द या घराण्याच्या इतिहासात खुपच महत्वपुर्ण आहे. यानंतर राजे शिवाजी (1833 ते 1855) गादीवर होते. परंतु प्रत्यक्षात राज्य कारभार इंग्रजांच्या हाती होता. शिवाजी राजे निपुत्रिक वारल्याने 1855 मध्ये इंग्रजांनी तंजावर संस्थान खालसा केले.

प्रकरण तिसरे- सरफोजी राजे भोसले द्वितीय : जन्म व बालपण

राजे तुळजाजीच्या काळात राज्यात भ्रष्टाचार व अनागोंदी माजली. याच काळात इंग्रजांचा चंचुप्रवेश झाला. हैदरच्या स्वारी मुळे राज्य खिळखिळे बनले. पुढे राज्य कारभार इंग्रजांच्या हातात गेला. तुळजाजीने एक बालक दत्तक घेतले ते म्हणजे सरफौजी राजे द्वितीय. ते बालक भोसले यांच्या मूळ पुरुष मालोजी राजे यांचे भाऊ विठोजी राजे यांच्या वंशातील होते. त्यांच्या संगोपनाची व शिक्षणाची जबाबदारी सी. एफ. श्वार्टस नावाच्या मिशनरी गृहस्थाकडे सोपविली. त्यांना बालपणी उचित शिक्षण मिळाले. त्यांनी इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, लॅटीन इत्यादी पाश्चात्या भाषे बरोबर मराठी, तेलगू, हिंदी, संस्कृत इत्यादी भारतीय

भाषांचे ज्ञान मिळविले. त्यांना लहानपणापासुन ग्रंथ वाचनाची आवड होती. इंग्रजी साहित्य व पाश्चात्या ज्ञानाचा त्यांनी अभ्यास केला. ते सज्ञान होई पर्यंत त्यांच्या सावत्र काकाने (अमरसिंह) यांनी कारभार पाहिला. पुढे सरफोजी राजे भोसले द्वितीय यांनी 35 वर्ष राज्य कारभार केला. त्यांची कारकिर्द या घराण्यात सर्व राजांमध्ये महत्त्वपुर्ण ठरते.

प्रकरण चौथे- सरफोजी राजे भोसले द्वितीय यांचे कार्य :

सरफोजी राजे द्वितीय हे स्वतः विद्वान, कवी, ग्रंथवेडे, कलेचे चाहते होते. विद्वानांच्या मदतीने त्यांनी सरस्वती महाल हे ग्रंथालय समृध्द केले. त्यांनी अनेक संस्कृत ग्रंथ, काव्य, नाटके, टिका लिहून घेतल्या. प्राचीन ताम्रपट, ताडपत्रे, भुर्जपत्रे इत्यादीचा मोठा संग्रह करुन घेतला. 16 भिन्न खाती करुन 'दमित' (प्रमुख) त्यावर नेमले. त्यांना वैद्यकशास्त्र, संगित, चित्रकला व शिल्पकला यांची आवड होती. तंजावर येथे छापखाना सुरु करुन देवनागरी लिपितील खिळे बनवून घेतले. पवनचक्की, विद्युत यंत्र, वेधशाळा, शिपयार्ड इत्यादी स्थापन केले. 1752 मध्ये Dr. Jacques Davie (फ्रेंच वैद्यक) यांनी मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेचा शोध लावला. मोतीबिंदूची शस्त्रक्रिया भारतात फ्रेंच तज्ञ करत होते. ही कला राजांनाही ज्ञात होती. ते औषधोपचार व शस्त्रक्रिया करत. महाराजांनी 'सर्वेंद्र वैद्य मूरेगाल' नावाचा वैद्यकशास्त्रावरील ग्रंथ लिहीला. तिर्थयात्रेस जातांना ते सोबत उपकरणे नेत. त्यांनी शाळा, दर्गे, मंदिरे यांना मदत केली. त्यांनी संगितावरील ग्रंथ रचले याशिवाय नौदल अभ्यास केंद्र, हवामान संशोधन केंद्र, बंदुकीचा कारखाना बांधला. त्यांना मुक्ताबाई व अहिल्याबाई या दोन पत्न्या होत्या. मुक्ताबाईंचे अकाली निधन झाले. अहिल्याबाई पासुन त्यांना तीन मुली व एक मुलगा झाला. तोच पुढे शिवाजी राजे या नावाने गादीवर आला.

प्रकरण पाचवे- उपसंहार

या प्रस्तुत प्रकरणात शोध प्रबंधाचा सारांश व उपलब्धी मांडण्यात आली आहे. महाराजांचे योगदान विषद करण्याचा प्रयत्न या पाठातुन केला जाणार आहे.

संदर्भ ग्रंथसुची

अ) प्राथमिक साधने :-

1) मराठी साधने-

- चौबळ ज.स. ‘असे होते मोगल’ (निकोलाय मनूची लिखित ‘Storia Do- Mogor’ ग्रंथाचा अनुवाद), महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, 1974.
- सरदेसाई गो.स. ‘ऐतिहासिक पत्रव्यवहार’ समर्थ भारत, पुणे 1933.
- देशपांडे प्र.न. ‘छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे’ सुषमा प्रकाशन, धूळे 1983.
- आपटे द.वि. ‘शिवचरित्र प्रदीप’, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे 1947.
- श्रीनिवासाचार्य श्री.वे. आणि गोपालन एस. ‘तंजापुरी श्री बृहदीश्वरालयस्थ शिलालिखित भोसले वंश चरित्र’ तंजावर शरफोजी सरस्वती महाल ग्रंथ संग्रहालय, तंजावर, 1980.
- गोपाळ विवेकानंद ‘तंजावर महाराज सरफोजी सरस्वती महाल ग्रंथालयातील मोडी कगदपत्रे खंड-1’ तंजावर महाराज सरफोजी सरस्वती महाल ग्रंथालय प्रकाशन, तंजावर 1998.

2) इंग्रजी साधने :-

- Balinga B.S. ‘Tanjore District Handboot’, Madras, 1960.
- Preice J.C. ‘Ananda Ranga Pillai- Daiary and consultation book Vol-VT Asian Education Services, New Delhi, Reprint, 1985
- Varadrajan Lotika, ‘Indian in the 17th Century (Social,Economics and Political) memories of the francois martin- Translated and Annoted Vol-I-II, Manohar publication, New Delhi, 1983.

3) तमिळ साधने :

- Raju- ‘Fifty copper plates of the marathas of Tanjore, Inscriptions of Tanjore Maratha Kings’, Tamil University, Tanjore, 1983.
- Raju- ‘Inscriptions of Tanjore Maratha Kings’, Tamil University, Tanjore, 1983.
- Vankatramaya, ‘Administration and social life under the Maratha rulers of Tanjore’, Tamil University, Tanjore, 1984.

ब) दुय्यम साधने :

1) मराठी साधने :

- वाकसकर वि.स. 'तंजावरचे मराठे राजे', दामोदर सावळाराम आणि मंडळी, मुंबई, 1933.
- पगडी सेतु माधवराव, 'कावेरी खो-यातील यक्षनगरी' परचूरे प्रकाशन, 1993.
- विद्या गाडगीळ, 'तंजावरचे मराठी राज्य आणि संस्कृती' पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई 2003.
- कदम उमेश अशोक, 'फ्रेंच-मराठा संबंध' (1668 ते 1818), पुष्पगंध प्रकाशन, पुणे 2011.
- पारसनीस द.ब. 'तंजावरचे राजघराणे', निर्णयसागर, मुंबई 1912.

2) इंग्रजी साधने :

- Hickey William, 'The Tanjore Maratha Principality in Southern India' Asian Education Services, New Delhi, Reprint, 1988.
- Rajayyan K., 'A History of British Diplomacy in Tanjore', Rao and Raghavan, Mysore, 1969.
- Subramanian K.R. 'The Maratha Rajas of Tanjore', Asian Education Services, New Delhi, Reprint, 1985.
- Rajayyan K., 'History of Tamilnadu', (1565 To 1982) Raj Publishers, Madras, 1982.
- Prince Pratapsingh Sarfogi Raje Bhosle, 'Contribution of Tanjore Marathas Kings'.

स्थळ : परभणी. दिनांक:-18/11/2019

संशोधक मार्गदर्शक

प्रा.डॉ.बंडे एस.जी.
इतिहास विभाग प्रमुख
स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार
महाविद्यालय, पुर्णा
ता.पुर्णा जि.परभणी

संशोधक

श्री. बालासाहेब गोविंदराव कानडे
श्री गुरु बुध्दिस्वामी
महाविद्यालय,पुर्णा (जं.)
ता.पुर्णा जि.परभणी